


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




Sangamner ▪ MAHMAR/2018/75654 ▪ SRP/135/2022-2024 ▪ वर्ष ८ ▪ अंक ८ ▪ ६/५/२०२५ (दैनिक) ▪ किंमत रु.२/- ▪ पाने ४







# दिलासा! ‘पुणे-नाशिक’ रेल्वेमार्ग आकाराला येणार!

## राज्य शासनाला ‘डिपीआर’ सुपूर्द

## ‘जीएमआरटी’ प्रकल्प वगळून नवा मार्ग

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

मागील साडेतीन दशकांपासून प्रतिक्षा असलेल्या मात्र खोडदजवळील ‘जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी)’ प्रकल्पाच्या कारणाने जवळजवळ गुंडाळलेल्या ‘पुणे-नाशिक’ सेमी-हायस्पीड रेल्वेमार्गाबाबत अत्यंत दिलासादायक वृत्त समोर आले आहे. सदरचा रेल्वेमार्ग रद्द करण्याची घोषणा झाल्यानंतर पुणे-अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात मोठी नाराजी निर्माण झाली होती. त्यामुळे या तिनही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना साकडे घालून ‘जीएमआरटी’ला वळसा घालून हा मार्ग नेण्याची विनंती केली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत मध्यरेल्वेकडून नव्याने रेल्वेमार्गाची रचना करण्यात आली असून त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) राज्यशासनाला सुपूर्द केला आहे. सरकारने या अहवालाला मंजूरी दिल्यानंतर तो रेल्वेमंत्रालयाकडे सादर होणार असून त्याला तत्काळ मंजूरी दिली जाईल असे आश्वासन रेल्वेमंत्र्यांनी दिले आहे. विशेष म्हणजे या



- पुणे व नाशिक या दोन महानगरांच्या दरम्यान प्रस्तावित असलेल्या या रेल्वेमार्गाचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर आता त्याचा फैसला राज्य सरकारच्या हातात आहे. रेल्वेमंत्र्यांच्या आदेशानंतर मध्य विभागाने पुणे–नाशिक व्हाया संगमनेर आणि पुणे–नाशिक व्हाया अहिल्यानगर या दोन्ही रेल्वेमार्गांचे सर्वेक्षण आणि त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन व्हाया संगमनेर–सिन्नर या सुधारित रेल्वेमार्गाचा अहवाल राज्य शासनाकडे सोपवला आहे. त्यांच्या मंजुरीनंतरच तो रेल्वेमंत्रालयाकडे जाणार असल्याने या तिनही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडून लवकरात लवकर त्याला मंजूरी मिळवून पुढील प्रक्रियेला गती देण्याची गरज आहे.

रेल्वेमार्गाला पर्याय म्हणून पुणे-अहिल्यानगर मार्गे शिर्डी या नव्या मार्गाची घोषणा करण्यात (पान ३ वर)

# संगमनेरच्या गुटखा तस्करीत घारगाव पोलिसांचा हात?

## माहुलीत लोकांनी धरला टेम्पो

## पोलिसांकडून मात्र झाली टाळाटाळ



- ४६ गावांमधील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेले घारगाव पोलीस ठाणे गेल्या दशकभरात निष्क्रिय आणि हप्तेखोर प्रभारी अधिकाऱ्यांच्या कारनाम्यांमुळे सतत चर्चेत आहे. मुख्यालयापासून जवळपास ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या या पोलीस ठाण्याचे आजवरचे अधिकारी इथे होणारी नियुक्ती फक्त पैसा कमावण्यासाठीच आहे असे समजूनच पदभार स्वीकारत असल्याने सद्यस्थितीत पठारभागात गांजा, चरसपासून अगदी एमडीपर्यंतचे अंमलीपदार्थ आणि मटका, गुटखा, जुगार, दारु, वाळू अशा सगळ्याच बेकायदा व्यवसायांचे ‘हब’ बनले आहे. त्यामुळे पठारभागातील गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असून भविष्यात या भागातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती गंभीर होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व आमदार अमोल खताळ यांच्याकडून वारंवार सूचना होवूनही संगमनेर तालुक्यातील अवैध व्यवसाय नियंत्रणात येत नसल्याचे दिसत आहे. त्यातून अशा व्यावसायिकांशी (पान ३ वर)

# थोरात यांचा पराभव ही जनतेकडून झालेली मोठी चूक : अभिनेत्री लांडगे



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संपूर्ण संगमनेर तालुका हा आपला परिवार मानला. एकही दिवस विश्रांती न घेता सातत्याने जनतेसाठी काम केले. सर्व समाजाला बरोबर घेतले. शांत, संयमी आणि सेवाभावी असे नेतृत्व तालुक्याला आणि जिल्ह्याला लाभले. मात्र अशी कोणती हवा होती की, ज्यामुळे विधानसभेत थोरात यांचा पराभव झाला. नक्कीच विधानसभा निवडणुकीत संगमनेर तालुक्यातील जनतेकडून चूक झाली (पान ३ वर)

# ज्यांना जनतेने नाकारले त्यांनी पाण्याचे राजकारण करू नये : ना. विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

ज्यांना विधानसभा निवडणुकीत जनतेने नाकारले ते आपल्या राजकीय अस्तित्वासाठी दांडगाई करून पाण्याच्या आडून राजकारण करीत आहेत.परंतू तुम्ही या भानगडीत पडू नका, राज्यात महायुतीचे सरकार आहे.पाण्याच्या प्रश्नात आम्हाला राजकारण करायचे नाही. शेतकऱ्यांना कोणी वेठीस धरत असेल तर आम्ही सहन करणार नाही असा पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता दिला. (पान ३ वर)



# आमदारांनीच पकडला अवैध वाळू वाहतूक करणारा डंपर!

## गुन्हा दाखल; दहा लाखाचा मुद्देमाल हस्तगत



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यात अवैद्य वाळू तस्करी सुरूच असल्याची प्रचिती खुद्द आमदार अमोल खताळ यांनाच आली. एका कार्यक्रमासाठी जात असताना त्यांना वाळूने भरलेला डंपर दिसला आणि त्यांनी तात्काळ तो डंपर थांबवुन याची माहिती तहसीलदार आणि पोलिसांना (पान ३ वर)



















सुविचार : जी व्यक्ती तुमच्या चेहऱ्यावर हास्य फुलून शकते, तीच तुमच्या जीवनाला अर्थ देऊ शकते. – स्वामी विवेकानंद

## कारवाईस विलंब का?

काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत कोणत्या प्रकारचे प्रत्युत्तर देतोय याबाबतची उत्सुकता केवळ परकीय देशांनाच नाही, तर देशातील कोट्यवधी नागरिकांनाही आहे.एकीकडे परकीय देश आणि भारताचे मित्र भारताला संयमाची भूमिका घेण्याचे आवाहन करत असताना सर्वसामान्य भारतीय नागरिकाला मात्र यावेळी भारताने ठोस भूमिका घेऊन पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा असेच वाटत आहे. या सर्वसामान्य नागरिकाच्या मनात पाकिस्तानला धडा शिकवण्याबाबत ज्या अपेक्षा आहेत, त्याचे ओझे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर दिवसागणिक वाढत चालले आहे. यापूर्वी भारताने केलेल्या कारवाईबाबत जोरदार चर्चा झाली असल्याने आता यावेळी भारत कोणत्या प्रकारची कारवाई करतो याबाबतची उत्सुकता असल्यानेच अपेक्षांचे हे ओझे वाढत चालले आहे. पहलगामच्या घटनेनंतरच सोशल मीडियाच्या माध्यमातून एका वेगळ्या प्रकारच्या युद्धाला सुरुवात झाली होती. पण प्रत्यक्ष युद्धसदृश कारवाई करणे तेवढे सोपे नसते हे सर्वसामान्य नागरिकांनीसुद्धा लक्षात घेण्याची गरज आहे. उरी येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने सर्जिकल स्ट्राइक केला होता किंवा नंतर पुलवामा हल्ल्यानंतर बालाकोट येथे एअर स्ट्राइक केला होता, तेव्हासुद्धा हल्ल्याची घटना आणि कारवाईची घटना यामध्ये बराच कालावधी गेला होता. या सर्व गोष्टी करण्यासाठी विविध प्रकारचे नियोजन करावे लागते.गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये भारताने विविध प्रकारे पाकिस्तानच्या नाड्या आवळण्याचे काम सुरू केले आहे. भारतात वास्तव्यात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना पाकिस्तानात पाठवण्याची मोहीम राबवण्यात आली. आता भारताने पाकिस्तानसोबतचा पूर्ण व्यापार बंद केला आहे. पहलगाम हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून भारत सरकार काही करत नाही असे नाही. उलट पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळून कोंडी करण्याचे काम जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. कारण भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराचा विचार केला तर भारत पाकिस्तानमधून खूपच कमी गोष्टी आयात करतो, पण पाकिस्तानला मात्र दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टींसाठी भारतातून येणार्या वस्तूंवर आणि सेवांवर अवलंबून राहावे लागते. साहजिकच लवकरच होणार्या एखाद्या अपेक्षित कारवाईपूर्वी वातावरण निर्मितीसाठी या सर्व गोष्टी केल्या जात आहेत हे उघड आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पहलगाम हल्ल्यानंतर गेल्या दहा दिवसांच्या कालावधीमध्ये पाकिस्तानच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील कारवायाही वाढत चालल्या आहेत. दररोज तेथे गोळीबाराच्या घटना घडत आहेत. भारतातर्फे त्यांना प्रत्युत्तर दिले जात असले तरी पाकिस्तानची मग्रुरी काही कमी होत नाही हेच त्यावरून समोर येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाकिस्तानला शेवटचा धडा शिकवायची वेळ जरी आली असली तरी सर्व बाबी विचारात घेऊनच हा निर्णय घ्यावा लागणार आहे. एकीकडे जगातील मुस्लीम देशांपैकी २५ देशांनी पाकिस्तानला पाठिंबा दिला असला, तरी तुर्कस्तान वगळता इतर देश तसे किरकोळ आहेत. दुसरीकडे यूएई आणि सौदी अरेबिया या प्रमुख मुस्लीम देशांनी मात्र भारताला पाठिंबा दिला आहे हासुद्धा भारताचा राजनैतिक विजय मानावा लागेल. म्हणूनच पाकिस्तानवर कोणतीही जोरदार कारवाई करण्यापूर्वी भारताला पाकिस्तान हा गुन्हेगार आहे आणि आम्ही गुन्हेगाराला शासन करण्यासाठी कारवाई करत आहोत अशा प्रकारची वातावरण निर्मिती करावीच लागणार आहे. कारवाई कोणती करायची आणि कधी करायची याबाबत निश्चितच निर्णय झाला असू शकतो. पण पत्रकार परिषद घेऊन किंवा एखादी प्रेस नोट काढून अशा प्रकारचे निर्णय जाहीर केले जात नाहीत ही गोष्टसुद्धा सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात यायला हवी. सध्या पाकिस्तानमधील पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान या परिसरामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा फायदाही करून घेण्याचे काम भारत सरकारला करावे लागणार आहे. देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांचे ओझे जरी सरकारवर असले तरी त्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष करूनच सरकारला निर्णय घ्यावा लागणार आहे. यावेळी पाकिस्तानला एकदाच आणि शेवटचा धडा शिकवायचे नियोजन करावे लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांच्या कालावधीमध्ये भारतामध्ये ज्या दहशतवादी घटना घडल्या त्या सर्व घटनांमध्ये पाकिस्तान हा देश, पाकिस्तानची आयएसआय ही गुप्तचर संस्था आणि पाकिस्तानमध्ये दडून बसलेल्या दहशतवादी संघटनांचे नेते हे सर्व जबाबदार असल्याचे आतापर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले असल्याने पुन्हा पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी पाकिस्तानला एकदाच धडा शिकवावा लागणार आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला कायमचे गाडण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध झाली असल्याने सर्व बाजूंनी विचार करून पूर्णपणे नियोजन करून आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली दबून न जाताच मोदी सरकारला ही कारवाई करावी लागणार आहे, हे निश्चित.


## गतकाळातील पुस्तकांविषयी बरंच काही...पुस्तकानुभव


आस्वाद... संदीप वाकचौरे

पुस्तकं ही प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी असतात. काही पुस्तकं माणसांच्या जीवनावर परिणाम करतात.काही पुस्तकं माणसाला जगण्यासाठी शक्ती,प्रेरणा देत असतात. मात्र काळ जसा पुढे सरकत जात राहतो, त्याप्रमाणे काही पुस्तकं पुढच्या पिढीसाठी टिकून राहतात. काही मात्र काळाच्या ओघात मागे पडतात. पुस्तके मागे पडतात म्हणजे ती संपतात असं होत नाही. ती पुस्तक एका पिढीने दुसऱ्या पिढीच्या हातात देण्याची आवश्यकता असते, पण शंभर वर्षापूर्वीची इतिहासातील काही चांगली पुस्तके नवाचकांना अनुभवता यावीत, त्या पुस्तकाची अनुभूती छोट्याशा परिचयातून वाचकांना व्हावी या दृष्टीने पुस्तकांचा इतिहास सांगणारे, पुस्तकांची गोष्टींचा अनुभवदेणारे ' पुस्तकानुभव' हे प्रा. दिलीप फडके यांनी लिहिलेले पुस्तक वाचकांना गतकाळातील पुस्तकांचे विश्व उलगडून दाखवते आहे. खरंतर हे पुस्तक वाचताना यातील अनेक पुस्तके आपली वाचायची राहून गेली असे अनेकदा वाचकांना वाटून जाते. मात्र पुस्तक वाचल्यानंतर आपण हे पुस्तक वाचायला हवे म्हणून वाचकांच्या मनामध्ये जिज्ञासा निर्माण होते हेच या पुस्तकाची यश आहे.

खरंतर एखाद्या माणसाने अत्यंत उत्तम दर्जाची पुस्तके मिळवावी, ती वाचावी आणि या पुस्तकातील उत्तमोत्तम ते काय आहे हे वाचकांपर्यंत पोहोचवावे हे मोठे काम आहे. ते काम प्रा. फडते यांनी या पुस्तकाच्या निमित्ताने केले आहे. हेपुस्तक म्हणजे ज्ञान अमृताचा प्रचंड मोठा ठेवा आहे. हा ठेवा नव्या पिढीच्या हाती सुपूर्द केला आहे. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे शंभर वर्षापूर्वीच्या अधिकाधिक चांगल्या पुस्तकांचे विश्व उलगडून वाचकांना समृध्दतेचा प्रवास घडवणारे आहे. त्यादृष्टीने हे पुस्तक अधिक महत्त्वाचे ठरते. आज मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे,मात्र हा दर्जा मिळवून देण्यासाठी मराठीतील साहित्य प्रवाह सातत्याने उंचावलेला गेला आहे. शंभर वर्षांपूर्वीची ही पुस्तके आपल्या मराठीचे अभिजात पण टिकवणारे आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचताना शंभर वर्षांपूर्वी देखील मराठी साहित्य किती समृद्ध आणि उंचावलेले होते हे वाचकांच्या सहज लक्षात येते. प्रा. दिलीप फडके यांनी या पुस्तकामध्ये एकूण ४५ पुस्तकांचा अत्यंत वाचनीय आणि सहज सुलभ परिचय करून दिला आहे. यातील काही पुस्तकांची वरवर नावे वाचली तर किमान नावे ऐकली आहेत असे अनेकांना वाटून जाते. अशा काही पुस्तकांचा समावेश या पुस्तकात करण्यात आलेला आहे. नीतीदर्पण या पुस्तकापासून पुस्तकांचा परिचय सुरू होतो आणि परमात्मा सोपान या पुस्तकापर्यंत येऊन थांबतो. हे सारे पुस्तक वाचतताना जुन्या काळातील पुस्तकांच्या परिचयाचे सहज सुलभ असे पुस्तक झाले आहे.

या पुस्तकामध्ये ज्या पुस्तकांविषयी भरभरून लिहिले गेले आहे ती सर्व पुस्तके सन१८३० ते १९१० अशा कालखंडातील आहे. आता ती सारीच पुस्तके दुर्मिळ झाली आहेत. पुस्तकांची निवड देखील अत्यंत चांगली आहे. वाचकांना इतिहास उलगडत जात असताना त्याकाळातील माणसांच्या विचाराची प्रक्रिया देखील समजत जाते. वर्तमानात जी गरज वैचारिक प्रवासात समाजाला वाटते आहे तो विचार त्याही काळात केला गेला होता हे लक्षात येत जाते. नीतीदर्पण या पुस्तकाविषयी लिहिताना म्हटले आहे की,हे पुस्तक जीवनमूल्यांना नव्या काळाचा संदर्भ देऊन अर्थ सांगणारे पुस्तक आहे. १८३१ साली या ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. या पुस्तकामध्ये एकूण दहा कथांचा समावेश करण्यात आला आहे. कथेच्या अखेरीस कथेचे सार सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. इंग्रज लोक आरंभी अज्ञानी, दरिद्री, जंगली




मनुष्यासारखेच होते. मात्र त्यांच्या परीवर्तन नेमके कशाने आले असा प्रश्न विचारला गेला तर त्याचे उत्तर त्यांच्या अंगी विद्या होती हेच मिळते. शिक्षणाचे मोल त्याही काळापासूनच अधोरेखित करण्याचा प्रयत्न अनेक ग्रंथांमधून झाला आहेत. तो प्रयत्न याही ग्रंथात करण्यात आला आहे. इंग्रज या देशात आल्यानंतर नेमके काय बदल झाले आहेत हे सांगणारी अनेक विवेचनात्मक पुस्तके त्याही काळात तत्कालीन विदवानांनी लिहिली होती. त्यांनी शिक्षण सुरू केल्यानंतर पाश्चात्य मूल्यांचा विचार विवेक आणि शहाणपणाची वाट दाखवेल असा विश्वास वाटत होता. अनेकांनी इंग्रजाचा तिरस्कार केला असला तरी या पुस्तकात देखील लोकांना इंग्रजांचे राज्य नको होते असे निदान हे लिखाणावरून दिसत नसल्याचा निष्कर्ष नोंदवला आहे. इंग्रजांनी या देशातील लोकांना रोजगार दिला, कामाची वेळ पैसे दिले, व्यापार वाढवला. कापूस उत्पादनासाठी जमीन दिल्या अशा अनेक गोष्टींची नोंद याही पुस्तकात झालेली दिसते. या पुस्तकांमध्ये वर्तमानात असलेल्या मूल्यांचा विचार आहे. त्याही काळामध्ये अधोरेखित करण्यात आला होता. या कथांमध्ये दोन विरुद्ध टोकांच्या कथाही वाचकांना वाचायला मिळतात. चांगली बाजू वाईट बाजू, चांगले वागल्याचे फळ, वाईट वागण्यामुळे मिळणारे फळ यासारख्या अनेक गोष्टी यात नोंदवण्यात आला आहे. चांगुलपणाच्या व्याख्याही करणारे काही निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत. विष्णुशास्त्री बापटांचे हे पुस्तक वाचताना लेखक समाजभिमुख विद्वान होते हे सहजपणे लक्षात येते. आजच्या समाजात विद्वानांची संख्या दिवसेंदिवस रोडावत आहेत याबद्दलची खंतही लेखक नोंदवतात. वर्तमाना आणि इतिहास यांची सांगड अनेक ठिकाणी घातली असली तरी वर्तमानाचे वास्तव विदारक असल्याचे प्रतिबिंबीत होत जाते.

नाशिक शहरामध्ये पहिली शाळा सुरू करणारे फरार कुटुंब आणि त्यांच्या संदर्भातील बरेच काही कुटुंबप्रवर्तननीती या पुस्तकात वाचायला मिळते. हे पुस्तक १८३५ साली प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक भाषांतरीत असल्याचे पुस्तकाविषयी त्यावर नमूद केलेल्या माहितीवरून लक्षात येते. हे पुस्तक त्या काळातील शिळा प्रेस वर छापण्यात आलेले आहेत. पुस्तक शिक्षण व पालकत्वविषयी बरेच काही सांगणारे आहे. मुलांचे नुसते पालक पोषण केले म्हणजे आई बापाची जबाबदारी संपत नाही. त्यांना संस्काराकडे वळवावे लागते ही देखील आई–बाबांची जबाबदारी आहे असे देखील नमूद केले आहे. हा ग्रंथ कीर्तीसाठी किंवा लाभासाठी केलेला नाही, तर लेकरांचे हितासाठी उत्तम शिक्षण मार्ग दाखविण्याकरिता लिहिण्याचा उल्लेख करण्यात आला असल्याचे पुस्तकात आढळते. इलायतेत मुलांच्या शिक्षणाविषयी फार तरतम्य भाव आहे. अंकुर जसा वळविला तसा वृक्ष वाढतो तसे अर्भक ज्या मार्गात प्रवर्तविले त्यामार्गास प्रवर्तते. आई–बापामध्ये फाट नसावा आणि विकल्प निर्माण झाला तरी मुलांपुढे मुद्दाम लपवावा अशी सूचनाही त्या काळात दिलेली दिसते. अर्थात या लेखातील सर्व निरीक्षणे वर्तमानात जशी आहे तशीच लागू पडतात हे वाचताना जाणवत राहाते. मुलांच्या चुकांच्या गांभीर्याच्या प्रमाणात त्यांना शिक्षा करावी. आपल्याला किती राग आहे यावर ते अवलंबून नसावे. हे सांगताना राग काही आपणास, संतोष काही दुसऱ्यास या मराठी म्हणीचा फरार बाई वापर करतात. एकूणच धर्मप्रसारासाठी आलेल्या एका महिलेने इतिहासात स्थानिक भाषा आत्मसात करून पुस्तक लिहिणे ही गोष्ट उल्लेखनीच म्हणायला हवी. वर्तमानात पालकत्व ही महत्त्वाची गोष्ट महत्वाची असताना, सुमारे २०० वर्षांपूर्वी अशा प्रकारचा विचार करणारे पुस्तक बाजारात येणे हे उल्लेखनीय म्हणायला हवे. नाशिक शहरात प्रकाशित झालेले हे सर्वात जुने पुस्तक आहे असे मानले जाते.

आज जगभरात व्यवस्थापन शास्त्राविषयी बोलले जाते. वेळेचे महत्त्व सांगणारे पुस्तके देखील बाजारात उपलब्ध आहे. मात्र सव्वासे वर्षांपूर्वी देखील त्या संदर्भाने काही पुस्तके लिहिली गेली होती. दत्तात्रय लोहकरे या लेखकाने पंच्याहत्तर पानाचे हे पुस्तक १९०६ साली प्रकाशित केले होते. जी. बी. नाईक या घड्याळ्याच्या उत्पादित कंपनीने हे पुस्तक प्रायोजीत केले होते त्यामुळे पुस्तकात जाहिरात प्रकाशित करण्यात आली आहे. वेळेचे महत्व सांगणा–या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यातील प्रथम क्रमाकांचा निबंध पुस्तकात प्रकाशित करण्यात आला आहे. वेळेचे महत्त्व सांगताना लेखकांने संताचे वचन आणि इंग्रजी सुवचनांचा विचार करत आहे. माणसांची विभागणी सदवर्तनी आणि दुर्वतनी अशी केलेली दिसून येते. ही माणसं आपला वेळ कसा खर्च करतात याविषयी या पुस्तकात बरेच काही वाचायला मिळते. आयुष्याचा संचय व्हावा यासंदर्भाने अत्यंत उत्तम स्वरूपाचे विवेचन या पुस्तकात वाचायला मिळते. मुळात वेळचे नियोजन करताना त्याकाळी देखील किती सुक्ष्म विचार केला जात होता हे सहजपणे लक्षात येते. आपला वेळ वाया जातो यासाठीची बोचणी मनात लागायला हवी त्यासाठी माणसांने रोजनिशी लिहिण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे.

आज आपल्या बोलण्यात म्हणीचा वापर केला जातो. मराठी भाषेची जी वैशिष्टये आहे. त्या संदर्भाने लिहिताना विद्याधर वामन भिडे यांनी १८९१ यानी म्हणीविषयी चार शब्द ही पुस्तिका प्रकाशित केली आहे. या पुस्तिकेत म्हणीविषयी सर्व काही वाचायला मिळते. म्हणी म्हणजे काय,त्याची गुण कोणती, त्या कशा उत्पन्न होतात. त्यांचा भाषेत काय उपयोग होतो, ज्ञानात कशी भर पडते याविषयी लिहिले आहे. म्हण म्हणजे शहाणपणाने भरलेले वचन आहे लेखकांने नमूद केले आहे. जे ज्ञान दिलेले असेल ते चटकदार रितीने दिलेले असावे असेही नमूद केले आहे. म्हणीचे गुण सांगताना त्यांनी म्हटले आहे की, ज्ञान, वैलक्षण्य, संकोट, जनंसमत्ती याबरोबर इतर गुणांचाही उहापोह केलेला दिसून येतो. माणसांच्या अनुभवासोबत म्हणीचा वापर वाढत गेला. व्यवहारातील ज्ञान लोक म्हणीच्या स्वरूपात साठवून ठेवत असे. या पुस्तकात भिडे यांचे भाषेवरील प्रेम, भाषेतील शब्दांवरचे प्रेम पुस्तिकेत वारंवार व्यक्त होते. यासह शुचीर्भूतपणा, विद्यार्थी, गुजराथ देशाचा इतिहास, जार्ज वाशिंग्तन याचा इतिहास, कप्तान कूकसाहेब यांचे जलपर्यंटन वृत्तांत, अर्थशास्त्रपरिभाषा, यमुनापर्यंटन, प्राकृत कवितेचें पहिलें पुस्तक,मुबंईचे वर्णन, विधवाविवाह, श्री शिवाजी चरित्र, हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणें, इतिहासातील निबंध, वकृत्त्वकला विवेचन, लेखरत्नमाला अथवा नाना फडणविसांचे निवडक पत्रांचा संग्रह, शोकिन नानूजीशेट आणि तारा नायकीन, शिवछत्रपतींचें चरित्र, अबलोन्नतिलेखमाला, अफझूल खानाच्या मृत्यूचा फार्स, म्हणींविषयी चार शब्द, मुबंईचा व्यापार, जावजी दादाजी चौधरी यांचे चरित्र, कर्तव्यसुख अथवा संसारसुख, दारिद्र्य घालविण्याचे सोप उपाय औद्योगिक सहकारिता, महाराणी लक्ष्मीबाईसाहेब,ब्राम्हण आणि त्यांची विद्या, हिंदू व मुसलमानांत होणारे तंटे व ते बंद करण्याविषयी विनंती, विचारसाधन, सर दिनकरराव राजवाडे मशीरखास मुंतजीम बहादूर यांचे चरित्र, नशीब आणि उद्योग, अर्थशास्त्र, वक्तृत्वकला, ग्यारिबाल्डी, लक्ष्मण बापूजी उर्फ भाऊराव कोल्हटकर यांचे चरित्र, जपान, मराठी खेळाचे पुस्तक, शुश्रूशा, जपानची मर्दूमकी यांसारख्या अनेक लेखांचा समावेश केला आहे. मुळात हे पुस्तक वाचताना यातील सर्वच पुस्तके आपण वाचायला हवीत असे वाटत जाते हेच या पुस्तकाचे यश आहे. पुस्तकाची भाषा साधी, सोपी आणि वाचकांच्या हृदयाला भिडणारी आहे. पुस्तकातील नेमके सार अत्यंत कमी शब्दांमध्ये सांगण्याची कला प्रा. फडके यांनी साधली आहे. हे पुस्तक हाती घेतल्यावर पूर्ण वाचल्याशिवाय हातून सुटत नाहीत. हे पुस्तक चपराक प्रकाशाने प्रकाशित केले आहे. अत्यंत देखणे सुंदर असेच हे पुस्तक झाले आहे. प्रत्येकाने वाचावे आणि आपला इतिहासातील पुस्तकांबरोबर विचाराची प्रक्रिया अत्यंत कमी शब्दात समजून घ्यावी. मराठीचे वांडःमय पण किती विविध विचांरानी समृध्द केले होते हे पुस्तक वाचताना सहजपणे लक्षात येते. अर्थात हे पुस्तक मराठीच्या प्रवासातील एक महत्त्वाचे पुस्तक ठरणार आहे म्हणूनच प्रत्येकाने वाचायला हवे. खरतेर प्राध्यापक फडके यांचे या निमित्ताने अभिनंदन करायला हवे. इतकी जुने पुस्तके आणि त्याचे सार या निमित्ताने वाचकांच्या हाती दिले आहे. त्यांनी हे दिलेले पुस्तक वाचकांना मराठीच्या पुस्तक इतिहासाचे पान पुन्हा पुन्हा उलगडून पाहण्याची जिज्ञासा निर्माण करते. पुस्तकाला मिलींद जोशी यांची प्रस्तावना लाभली आहे तर ज्योती घनश्याम यांनी अत्यंत समर्पक व अर्थपूर्ण मुखपृष्ठ रेखाटले आहे.

**पुस्तकाचे नाव– पुस्तकांनुभव**
**लेखक–प्रा. दिलीप फडके**
**प्रकाशक –चपराक प्रकाशन.पुणे**
**पाने –१९२**
**किंमत– तीनशे रुपये**


आरोग्य

## राजूर साथ प्रकोप आणि प्रशासकीय बेफिकीरी

### मूलभूत पाणीपुरवठा योजना कायमस्वरुपी मार्गी लागावी

आरोग्याची प्रशासकीय स्तरावर प्राधान्यक्रमाने काळजी आणि मूलभूत पाणीपुरवठा धोरण याबाबतीत आपल्या देशात विशेषतः ग्रामीण पातळीवर जेवढी काळजी घेतली जाणे आवश्यक तितकी घेतली जात नाही ही वस्तुस्थिती अन् कायमची शोकांतिका आहे. विशेषतः गांव खेड्यात तर पाणी वितरण व्यवस्था अधिक जटील आहे.

सध्या अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर या गावातील कावीळ साथीने घातलेले थैमान दुर्दैवी आणि अस्वस्थ करणारे आहे. राजूर गाव आणि आसपासची आदिवासीबहुल खेडी किमान मूलभूत पाणीपुरवठ्याच्या बाबतीत सातत्याने उपेक्षित राहिली आहेत. राजूर साधारण १५ हजार लोकवस्तीचे गाव. दुषित पाण्यामुळे साधारण २०० च्या आसपास रुग्ण कावीळीने




बाधित झाले आहेत. आतापर्यंत दोन रुग्ण दगावलेत. साथीचा फैलाव चिंताजनक रीतिने झालेला दिसतोय. पाणी फिल्ट्रेशनची व्यवस्था अनेक महिन्यांपासून गांभीर्याने घेतलेली नाही ही बाब स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर लाजिरवाणी आहे.

ग्रामपंचायत प्रशासन, सरपंच, सदस्य, ग्रामविकास अधिकारी अशी एकूणच व्यवस्था बेफिकीर तसेच बेजबाबदार आहे हे स्पष्ट झाले आहे. मुळात कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना आधुनिक यंत्रणा तसेच सुविधेसह अस्तित्वात असणे गरजेचे असताना त्याबाबतीतही अक्षम्य दुर्लक्ष – ढिसाळपणा झालेला दिसतोय. तालुक्याचे विद्यमान लोकप्रतिनिधी – आमदार हे स्वतः डॉक्टर! राजूर मध्येच राहणारे! कार्यसम्राट म्हणून – म्हणवून, मिरवण्यात सुखावणारे अन् सदैव खुशीत असणारे! तरीही अशी अत्यंत विदारक – करुण परिस्थिती ओढवलेली.. हे चांगले घडलेले नाही एवढे नक्की. पालकमंत्र्यांनाही गांभीर्य ओळखून धाव घ्यावी लागली. अनेक राजकीय नेते मंडळींनी राजूरकडे धाव घेतली.

राजूर गाव आणि परिसर तसेच जवळच असणारा भंडारदरा, रंधा, कळसूबाई शिखर, रतनगड असा सारा निसर्गाचे – पर्यटनाचे वरदान लाभलेला पंचक्रोशीतील परिसर आणि अशा कावीळ प्रकोपासारख्या घटना घडतात ही बाब स्थानिक प्रशासनाला लाजिरवाणी आहे. तातडीने दोषींवर कारवाई होऊन आरोग्य सुविधेसह उपाययोजना वेगाने होण्याची आवश्यकता आहे. मूलभूत पाणीपुरवठा योजना कायमस्वरुपी मार्गी लागावी यादृष्टीने पावले उचलली जाणे गरजेचे आहे.

**– डॉ.सुनील शिंदे**
**अकोले, अहिल्यानगर**

## मालतीबाई बेडेकर

विख्यात मराठी कांदबरीलेखिका. जन्म कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्हयातील आवास ह्या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात. शिक्षण घोडनदी, हिंगणे आणि मुंबई येथे ङ्गप्रदेयागमाफ(पी.ए.)ही कर्वे विद्यापीठाची, एम.ए.च्या दर्जाची, पदवी त्यांनी मिळविली. १९३८ साली विश्राम बेडेकर ह्यांच्याशी त्यांचा विवाह झाला. बाळूताई खरे हे त्यांचे विवाहापूर्वीचे नाव होय. प्रागतिक विचारांचे वडील, महर्षी अण्णासाहेब कर्वे, वामन मल्हार जोशी, श्री. म. माटे ह्यांच्या व्यक्तिमत्त्वांचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्यांचे पती विश्राम बेडेकर ह्यांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला. १९२५ सालापासूनच त्या लेखनाकडे वळल्या. कळ्यांचे निःश्वास (१९३३) हा त्यांचा पहिला कथासंग्रह विभावरी शिरुरकर ह्या टोपण नावाने प्रसिद्ध होताच मराठी साहित्यविश्वात मोठीच खळबळ उडाली. पुरुषी अहंकाराचे स्त्रियांवर होणारे आघात, वाढत्या कौमार्यकाळामुळे त्यांचा होणारा भावनिक कोंडमारा ह्यांचे अत्यंत प्रत्ययकारी दर्शन त्यांनी ह्या संग्रहातील जिवंत कथातून घडविले होते. सहनशीलतेचा अंत झालेल्या स्त्रीमनाच्या विद्रोहाचा हा एक स्फोट होते. कळ्यांचे निःश्वास ह्या कथासंग्रहानंतर हिंदोळ्यावर (१९३४), विरलेले स्वप्न (१९३५), बळी(१९५०), जाई(१९५२), शबरी(१९६२) ह्यासांरख्या कांदबऱ्या त्यांनी लिहिल्या. आपल्या कांदबऱ्यातूनही, मराठी साहित्यात दीर्घकाळ अव्यक्त राहिलेले स्त्रियांच्या व्यथांचे एक वेगळे वेदनाविश्व त्यांनी अत्यंत प्रांजळपणाने साकार केले. मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

पान १ वरुन

### दिलासा! 'पुणे-नाशिक' रेल्वेमार्ग आकाराला येणार!

आली होती. त्यानुसार या मार्गाचेही सर्वेक्षण पूर्ण झाले असून हा मार्गही तयार केला जाणार असल्याचे रेल्वेमंत्रालयाकडून सांगण्यात आल्याने जिल्ह्याला रेल्वेने मोठा बोनस दिल्याचे बोलले जावू लागले आहे.

पुणे ते नाशिक रेल्वेमार्गात सुरुवातीपासूनच विविध अडचणी उभ्या राहील्या आहेत. विशेष म्हणजे या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल मंजूर झाल्यानंतर त्याला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखवला होता. त्यामुळे प्रशासनाने तिनही जिल्ह्यात भूसंपादनाची प्रक्रिया राबवून मोठ्या प्रमाणात जमनींचे संपादन करुन त्याचा मोबदलाही शेतकऱ्यांना दिला. राज्य शासनानेही या प्रकल्पाला 'मेट्रो'च्या धरतीवर कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रलंबित रेल्वेप्रकल्पांसाठी निर्माण करण्यात आलेल्या 'महारेल'कडे हा प्रकल्प सोपवला होता. त्यामुळे येत्याकाही वर्षात या तिनही जिल्ह्यातील नागरिकांची प्रतिक्षा संपून पुणे व नाशिक शहरादरम्यान सरळमार्गाने रेल्वे पाहण्याचे स्वप्नं पूर्ण होण्याची आशा असतानाच खोडदजवळील 'जीएमआरटी' प्रकल्पामुळे त्यात सर्वात मोठा अडथळा उभा राहीला.

जुन्नर तालुक्यातील या प्रकल्पात लावण्यात आलेल्या रेडिओ दुर्बिणीतून २३ देशांतील शास्त्रज्ञ खगोलीय अभ्यास करतात. या प्रकल्पाजवळून सेमी-हायस्पीड रेल्वे धावल्यास रेडिओ लहरी मिळवण्यात अडचणी निर्माण होतील अशा शंकाही वर्तवण्यात आल्या. त्यामुळे रेल्वेमंत्रालयाने हा प्रकल्प वगळून पर्यायाची चाचपणी करण्याऐवजी थेट हा प्रकल्पच रद्द केला आणि पुणे ते शिर्डी व्हाया अहिल्यानगर या मार्गाचे सर्वेक्षण करुन त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) सादर करण्याचे आदेश रेल्वेच्या मध्य विभागाला दिले. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी विभागाने खासगी कंपनीद्वारा नव्याने पर्यायी मार्गाचे सर्वेक्षणही सुरु केले. त्यामुळे प्रस्तावित पुणे-नाशिक व्हाया संगमनेर हा रेल्वेमार्ग जवळजवळ गुंडाळल्यातच जमा झाला होता.

रेल्वेमंत्रालयाच्या या तडकाफडकी निर्णयाने पुण्यासह अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातही मोठी नाराजी निर्माण झाली होती. या प्रकल्पामुळे दोन महानगरे आणि चार औद्योगिक वसाहती एकमेकांना जोडल्या जाणार असल्याने विकासापासून दूर राहिलेल्या सिन्नर, संगमनेर, जुन्नर, नारायणगाव, आंबेगाव या तालुक्यांना विकासाचे स्वप्नं पडू लागले होते. मात्र अचानकच्या निर्णयाने ते भंगले त्याचा परिणाम या जिल्ह्यांमधील लोकप्रतिनिधींनी एकासूरात त्याला विरोध करीत 'जीएमआरटी' प्रकल्पाला वळसा घालून प्रस्तावित मार्गानेच हा रेल्वेमार्ग करण्याची मागणी लावून धरली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रस्तावित मार्गात थोडाफार बदल करुन नव्याने प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार भारतीय रेल्वेच्या मध्यविभागाने पुणे-अहिल्यानगर-शिर्डी या पर्यायी मार्गासह पुणे-नाशिक व्हाया संगमनेर या रेल्वेमार्गाचा नव्याने सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार केला असून तो राज्य शासनाला सोपवण्यात आला आहे. राज्य सरकारने या अहवालाला मंजूरी दिल्यानंतर तो केंद्रीय रेल्वेमंत्रालयाला सादर केला जाईल. त्यानंतर तत्काळ त्याला मंजूरी देण्याचे आश्वासन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्यात बोलताना दिले आहे. त्यामुळे जवळजवळ गुंडाळलेल्या या रेल्वेमार्गाचे स्वप्नं पूर्ण होण्याची आशा पुन्हा एकदा निर्माण झाली आहे.

### संगमनेरच्या गुटखा तस्करीत घारगाव पोलिसांचा हात?

यंत्रणेतील अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध खोलवर रुजल्याच्याही चर्चा सुरु असताना त्याला वास्तवाचा साज चढवणारी घटना समोर आली आहे. आज सकाळी पठारभागातील काही नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हिरा गुटखा भरलेले वाहन माहुलीजवळ पकडले व त्याबाबत घारगाव पोलिसांना कळवले. पोलिसांनी मात्र सदरचे वाहन ताब्यात घेवून कारवाईला प्राधान्य देण्याचे सोडून नागरिकांनाच धाकात घेण्यास सुरुवात केली. याबाबत संगमनेरच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना कळवण्यात आल्यानंतर अखेर नाईलाजाने घारगाव पोलिसांनी सदरचा टेम्पो ताब्यात घेतला असून अन्न व औषध प्रशासनाला कळवण्यात आले आहे. त्यावरुन संगमनेर तालुक्यातील गुटखा तस्करीत घारगाव पोलिसांचा थेट हात असल्याचेही ठळकपणे दिसून आले आहे.

याबाबत विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आज (ता.५) पठारभागातील माहुली घाटातून संशयास्पदरित्या जाणारे महिंद्रा-पीकअप वाहन (क्र.एम.एच.१७/बी.वाय.८५५६) काही जागृक नागरिकांनी रोखले. यावेळी त्यांनी पाठीमागे पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये भरलेला माल तपासला असता त्यात मोठ्या प्रमाणात हिरा गुटखा भरल्याचे दिसून आले. याबाबत वाहनचालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवी करीत जणू आपलं काहीच वाकडं होणार नसल्याच्या अविर्भावात वाहन पकडणाऱ्यांना धुडकावण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान काहींनी घारगाव पोलिसांना माहिती दिल्यानंतर बऱ्याचवेळाने सावकाश पोहोचलेल्या पोलिसांनी सुरुवातीला सदरचा टेम्पो आमच्या 'यादीवर' असल्याचे अजब आणि अतिशय धक्कादायक उत्तर दिले.

त्यामुळे उपस्थितांचा संताप अनावर झाल्याने त्यातील काहींनी याबाबत दैनिक नायकशी संपर्क साधून घडला प्रकार निदर्शनास आणून दिला. सदरील टेम्पोत मोठ्या प्रमाणात हिरा गुटखा भरल्याची छायाचित्रे प्राप्त झाल्यानंतर समाजाशी असलेली बांधिलकी जोपासताना दैनिक नायकने आपले दायित्व पूर्ण करताना याबाबत संगमनेरच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना सूचित केल्यानंतर अखेर नाईलाजास्तव घारगाव पोलिसांना कारवाईचा बडगा उगारावा लागला. सध्या गुटखा भरलेला टेम्पो घारगाव पोलिसांनी ताब्यात घेतला असून त्याबाबत अहिल्यानगरच्या अन्न व औषध प्रशासनाला कळवण्यात आले आहे.

गेल्याकाही वर्षात संगमनेर तालुक्यातील चारही पोलीस ठाण्यांच्या हद्दित अवैध व्यवसायाचे अक्षरशः स्तोम माजले असून अंमलीपदार्थ, मटका, गुटखा, जुगार, दारु, वाळू व गोमांस या सारख्या गोष्टींचा व्यवसाय करणाऱ्यांना अच्छे दिन आले आहेत. त्यातून तालुक्याच्या कानाकोपऱ्यात मोठ्या प्रमाणात फोफावलेल्या या व्यवसायांबाबत तक्रारी वाढल्यानंतर खूद्द जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना कठोर कारवाईच्या सूचनाही केल्या. मात्र घारगाव पोलिसांनी त्यांच्या सूचना फाट्यावरच सोडल्याचे आजच्या माहुलीतील प्रकाराने स्पष्टपणे समोर आले असून घारगाव पोलिसांनी जाहीरपणे सदरचे वाहन 'आपल्या यादीवर' असल्याचे उपस्थितांना सांगितल्याची जोरदार चर्चा आहे.

### आमदारांनीच पकडला अवैद्य वाळू वाहतूक करणारा डंपर!

दिल्यावर पोलिसांनी घटनास्थळी येत वाळू तस्करांवर गुन्हा दाखल करत तब्बल दहा लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला.

तालुक्यातील समनापुर येथे साठवून ठेवलेली वाळू डंपरमध्ये भरून ती विक्रीसाठी घेऊन जाणारा डंपर रविवारी रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास रायतेवाडी शिवारातील तनपुरेवाडी रस्त्यावरून जात होता. त्याचवेळी आ.अमोल खताळ रायतेवाडी येथे एका कार्यक्रमासाठी जात असताना त्यांना हा डंपर दिसला. त्याचक्षणी स्वतः आ. खताळ यांनी आपले वाहन थांबवत खाली उतरले आणि त्या डंपर चालकाकडे विचारपूस करत त्याला चांगलेच धारेवर धरले. त्यावेळी डंपर चालकाने उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर स्वतः आमदार अमोल खताळ यांनी ही माहिती तहसीलदार धीरज मांजरे यांना भ्रमणध्वनी वरून दिली आणि पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार महसूल व पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने वाळूने भरलेला १० लाख रुपये किंमतीचा डंपर आणि १५ हजार रुपये किंमतीची ३ ब्रास वाळू असा एकूण १० लाख १५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

याबाबत संगमनेर शहर पोलिसात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास भान्सी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी डंपर चालक अरबाज इसाक इनामदार (रा. सावरगाव घुले, ता. संगमनेर) तसेच वाळू तस्कर शुभम सारंगधर वामन (रा.कोल्हेवाडी, ता. संगमनेर) व गोरख हासे (पूर्ण नाव माहित नाही, रा.समनापुर) यांच्या विरोधात पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबतचा अधिक तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल भांगरे करत आहेत.

संगमनेर तालुक्यातील प्रवरा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू आहे. मागील दीड ते दोन महिन्याच्या पूर्वी आमदार अमोल खताळ यांनी जोर्वे नाक्या जवळ वाळूने भरलेला पिकअप पकडून शहर पोलिसांच्या स्वाधीन केला होता. त्यानंतर अवघ्या दीड ते दोनच महिन्यात पुन्हा आमदार खताळ यांनी स्वतः तनपुरेवाडी जवळ वाळूने भरलेला डंपर पकडत महसूल आणि पोलीस प्रशासनाला कारवाईचे आदेश दिले. त्यामुळे पोलिस आणि महसूल प्रशासन नेमके करते तरी काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### ज्यांना जनतेने नाकारले त्यांनी पाण्याचे राजकारण करू नये : ना. विखे पाटील

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत येणाऱ्या भंडारदरा प्रकल्पाच्या प्रवरा डावा व उजवा कालव्यावरील वॉटर केर्स पुनस्थापना व नुतनीकरणाच्या भूमीपूजन प्रसंगी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. यावेळी माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के,पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे,संचालक विजय म्हसे, अँड. अनिल भोसले, रंगनाथ उबंरकर,सुनिल तांबे,गोरक्षनाथ तांबे,आर. डी. कदम,सरूनाथ उंबरकर,विजय चतुरे, बँकेचे संचालक अजय ब्राम्हणे,संजय गांधी,प्रवरा शिक्षण संस्थेचे संचालक आण्णासाहेब भोसले,भाऊसाहेब ज्ऱ्हाड,अँड. रोहीणी निघुते,मंडल अध्यक्ष योगेश तांबे,गोकुळ दिघे,सरपंच तात्यासाहेब सातपुते,अलका गायकवाड,उपसरपंच नुकल तांबे,बाबा भवर, कान्हू गिते,भारत गिते, अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने,कार्य़कारी अभियंता स्वप्निल काळे यासह जलसंपदा विभागातील अधिकारी,भाजप कार्यकर्ते तसेच लाभधारक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलतांना विखे पाटील म्हणाले,पाणी पुरवठ्यासाठी कार्यान्वित असलेल्या जुन्या ब्रिटीश कालीन योजना सक्षम करण्याचे धोरण विभागाने हाती घेतले असून, लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्याला पाणी मिळाले पाहीजे हीच भूमिका आहे.मात्र ज्यांना जनतेने नाकारले तेच आता स्वतःचे राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी पाण्यासाठी राजकारण करून दांडगाई करीत आहेत.मात्र शेवटच्या भागातील शेतकऱ्याला वेठीस धरण्याचा प्रयत्न कोणी करत असेल तर, आम्ही सहन करणार नाही असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

मंत्री विखे पाटील म्हणाले की,लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे.यापुर्वी कालव्याच्या कामांना कधीही निधी मिळाला नव्हता.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने कालव्यांचे नूतनीकरण होत असून जुन्या पारंपरिक सिंचन व्यवस्था या माध्यमातून अधिक सक्षम होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याचा संकल्प महायुती सरकारने केला आहे.यासाठी पायाभूत सिंचन व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे काम विभागाने हाती घेतले आहे.भंडारदरा धरणामध्ये अधिकचे पाणी निर्माण करणे आणि पश्चिम वाहीनी नद्यांचे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी विभागाने प्रयत्न सुरू केले असल्याचे स्पष्ट करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,निळवंडे धरणाचे काम महायुती सरकारने पूर्ण केले.यंदाच्या आवर्तनातून लाभक्षेत्रातील शेवटच्या गावाला पाणी मिळावे म्हणून चांगले नियोजन विभागाने केले.आणखी एखादे आवर्तन होईल असा प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

### थोरात यांचा पराभव ही जनतेकडून झालेली मोठी चूक : अभिनेत्री लांडगे

असल्याचे स्पष्ट मत अभिनेत्री राजश्री लांडगे हिने व्यक्त केले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची अभिनेत्री राजश्री लांडगे हिने राजहंस दूध संघ येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी तुषार गायकर,नामदेव कहांडळ आदींसह विविध कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी गाढवाचं लग्न फेम राजश्री लांडगे हिने मराठी चित्रपट, त्यामधील स्पर्धा, आगामी काळातील प्रोजेक्ट, नव्या जुन्या कलावंतांचा समन्वय या विविध गोष्टींवर यशवंतराव चव्हाण यांचा समृद्ध वारसा जोपासणारे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या समवेत चर्चा केली.

यानंतर बोलतांना त्या म्हणाल्या की, खरे तर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यामुळे संगमनेरचे नाव राज्यामध्ये आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराभव हा कुणालाही मान्य नाही. आधी नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुद्धा या पराभवाबाबत शंका व्यक्त केली आहे. याचबरोबर मराठी चित्रपट सृष्टी मध्ये व विविध साहित्यिक, कलावंत यामध्येही या पराभवाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. असे कसे होऊ शकते असा मोठा प्रश्न आहे.जी व्यक्ती सातत्याने काम करते. राज्यभरात ज्यांचा आदर होतो. ज्यांच्यामुळे संगमनेर तालुक्याला मोठा मान- सन्मान मिळाला. विकासाच्या योजना गावोगावी पोहोचल्या अशा नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहायचे नाही तर मग कुणाच्या पाठीशी उभे राहायचे हा मोठा प्रश्न आहे. निवडणुका येतात आणि जातात परंतु विकासाची दिशा ठरवण्यासाठी नेतृत्व महत्त्वाचे असते.

तरुणांनी जातीभेदाच्या नावावर मतदान केले. पण मागील ४० वर्षाचे काम तुम्ही कसे विसरू शकता? असा सवाल करतांना आपल्या मध्ये भेदभाव निर्माण करून काही मंडळी राजकीय स्वार्थ साधत आहे, असे झाले नाही पाहिजे. यशवंतराव चव्हाण, शरद पवार, विलासराव देशमुख, बाळासाहेब थोरात या नेत्यांनी महाराष्ट्रासाठी योगदान दिले आहे. ज्यांनी योगदान दिले नाही अशी मंडळी आता बोलत आहे हे दुर्दैवी आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्याला वैभवाचे दिवस येतील यात शंका नाही. जय- पराजय विसरून हे नेतृत्व पुन्हा एकदा जनतेसाठी काम करते आहे. यातून नक्कीच तरुणांनी प्रेरणा घेतली पाहिजे असे सांगून एकनिष्ठतेचा नक्की विजय होतो असेही अभिनेत्री राजश्री लांडगे यांनी सांगितले.

## त्यांना पाणी प्रश्नावर राजकारणाचा अधिकार नाही : राहणे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



ज्यांनी चाळीस वर्ष या तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवण्याचे पाप केले, त्यांना व त्यांच्या स्वयंघोषित कार्यकर्त्यांना निळवंडे पाण्याच्या प्रश्नावर राजकारण करण्याचा कुठलाही नैतिक अधिकार नाही अशी टीका शिवसेनेचे संगमनेर तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे यांनी केली.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात राहणे यांनी म्हटले आहे की, ज्यांनी गेली ४० वर्ष या तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवले, निळवंडेवर अनेक निवडणुका जिंकल्या, त्यांना या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने घरी बसवले. आणि एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाला लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. हे त्यांना सहन होत नाही म्हणून या तालुक्याचे माजी लोकप्रतिनिधी, त्यांचे चुलत बंधू तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांकडे आता राजकारण करण्यासाठी कुठलेच मुद्दे शिल्लक राहिले नाहीत म्हणून त्यांनी निळवंडे पाण्याचे राजकारण करण्याची स्टंटबाजी सुरू केली आहे. त्यांच्या या राजकीय स्टंटबाजीला या तालुक्यातील जनतेने बळी पडू नये.

- टेल पासून हेड पर्यंत दोन्ही कालव्यावरील गावातील ओढे, नाले, बंधारे, पाझर तलाव भरून देण्याची जबाबदारी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्यावर आहे.ते तुम्हाला अजिबात वाऱ्यावर सोडणार नाहीत.त्यामुळे तुम्ही काळजी करू नका असा विश्वास राहणे यांनी व्यक्त केला.

## शहरात चुकीच्या पद्धतीने टाकले स्पीड ब्रेकर!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

**ज्येष्ठ नागरिकांना होतोय मणक्याचा त्रास**

शहरातील रस्त्यावर जागोजागी असणारे स्पीड ब्रेकर सध्या ज्येष्ठ नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. या स्पीड ब्रेकर मुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना मणक्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे असे स्पीड ब्रेकर हटवण्यात यावेत अशी मागणी जेष्ठ नागरिकांनी केली आहे.

शहरातील रस्ते तयार करतांना रस्त्याच्या कडेचे दुकान मालक किंवा घरमालक स्वतः रस्त्यावर दगड गोटे विटा आडवे टाकून त्यावर ठेकेदाराला कच व डांबर मिश्रित माल ओतायला सांगतात. हे रस्ते बांधणी नियमानुसार नसून अत्यंत चुकीचे स्पीड ब्रेकर सर्वत्र बसवली आहेत. शहरांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या भरपूर आहे. तसेच मणक्यांचे विकार असणारे नागरिक मोठ्या प्रमाणात आहेत. अशा प्रकारच्या सदोष स्पीड ब्रेकर वरून दुचाकी चालवताना अनेक ज्येष्ठ नागरिक दुचाकी अचानक बंद पडून पडले आहेत. त्यात अनेक जणांना फ्रॅक्चरही झाले आहे. शहरात मणक्यांच्या विकारांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत चालली आहे. अशाप्रकारे एकाच जागेवर उंच असलेल्या सदोष स्पीड ब्रेकर वरून दुचाकी वरून प्रवास करतांना जीवित हानी होण्याचीही भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. यासाठी नगर परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांकडून संबंधित सर्व ठेकेदारांना शासनमान्य नकाशा प्रमाणे सुयोग्य असा एकच स्पीडब्रेकर ( एकाच ठिकाणी तीन-तीन स्पीड ब्रेकर न करता) करण्यासंदर्भात सक्त लेखी स्वरूपाच्या सूचना देण्यात याव्यात. आणि भविष्यात होणारी जीवित हानी टाळावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांचा स्पीड ब्रेकर करण्यासाठी विरोध नाही, अत्यंत आवश्यक आणि अत्यंत योग्य त्या ठिकाणी त्याची आवश्यकता आहेच हे सर्व मान्य आहे. परंतु ते शासनमान्य नकाशा प्रमाणे झालेच पाहिजेत. अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन करून माहितीच्या अधिकारात माहिती मागवली जाईल अशीही चर्चा नागरिकांमध्ये केली जात आहे.



श्रीरामपुर : जिल्हा बुद्धीबळ संघटनेच्या मान्यतेने साई सोशल फाऊंडेशन व तुळजा फाउंडेशन यांच्या माध्यमातून पार पडलेल्या आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटनाच्या सामन्यात आमदार हेमंत ओगले यांनी बुद्धीबळाच्या पटलावर चेक मेट करत स्पर्धेत रंगत आणली. यावेळी सभापती सुधीर नवले, सचिन गुजर, ज्ञानेश्वर मुरकुटे, माजी नगरसेवक दिपक चव्हाण, भरत कुंकुलोळ,अंतराष्ट्रीय प्रशिक्षक शिवा काळे यावेळी उपस्थित होते. (छाया : रुपेश सिकची, श्रीरामपुर)

नायक ANCHOR

## निळवंडे धरणाच्या पाण्यापासून शेतकरी वंचित : डॉ.डेरे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

निळवंडे धरणातून डाव्या व उजव्या कालव्याद्वारे शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळेल अशी अपेक्षा असताना संगमनेर व अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांना या कालव्यामधून पिण्याच्या पाण्याचा लाभ घेता येत नाही. दोन्ही तालुक्यातील अनेक शेतकरी या धरणातील पाण्यापासून वंचित असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी तालुकाध्यक्ष डॉ. भानुदास डेरे यांनी केला आहे. या कालव्यातून शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे .



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, अकोले व संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या योगदानातून निळवंडे धरणाचे व कालव्याचे काम पूर्ण झाले आहे. या धरणासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. प्रदीर्घ कालावधीनंतर या धरणाचे व कालव्याचे काम पूर्ण झाले. या धरणाचे पाणी मिळेल अशी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची अपेक्षा होती . मात्र कालव्याचे काम होऊनही शेतकऱ्यांना धरणाचे पाणी मिळत नाही. निळवंडे धरणातून उजवा व डावा कालवा सुरू करण्यात आला. या कालव्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आल्याने शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ होत नाही. या धरणाचे पाणी संगमनेर-अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळण्याऐवजी सरळ खाली जात आहे. हा शेतकऱ्यांवर मोठा अन्याय आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्र्यांनी या प्रश्नात लक्ष घालून लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळेल यासाठी नियोजन करावे अशी मागणी डॉ. भानुदास डेरे यांनी केली आहे.याबाबत योग्य ती कार्यवाही न झाल्यास शेतकरी तीव्र आंदोलन करतील असा इशारा त्यांनी दिला आहे.

## वारीत पंधरा दिवसीय बाल सुसंस्कार शिबिराची सुरुवात!

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

तालुक्यातील वारी येथील कृष्णप्रिया वारकरी शिक्षण संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा भागवताचार्य सुरेखा महाराज टेके यांच्या संकल्पनेतून वारीसह पंचक्रोशीतील आठ ते अठरा वयोगटातील बालकांसाठी शनिवार दि.३ ते शनिवार दि.१७ मे दरम्यान पंधरा दिवसीय बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे शनिवारी मान्यवरांच्या हस्ते पखवाद, पेटी, टाळ, मृदुंग यांचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले.

या १५ दिवसीय शिबिरामध्ये उपस्थित बालकांना गायन, वादन, गीतापाठ, हरिपाठ, प्राणायाम, योगासने, कीर्तन, प्रवचन, सुसंस्कार, वारकरी संप्रदायातील पावल्या आदींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे शिबिर निवासी असणार आहे.


**पाहिजेत**

फोर व्हीलर वाहनांसाठी अनुभवी चालक पाहिजे.
जागा - ५
आकर्षक पगार व इतर सवलती
इथापे कॉलेज, संगमनेर.
७०२०८८६५६५, ९३७००७१७७७, ९८२२७९१४८४

**पाहिजेत**

नामांकित फॅक्टरी मध्ये जागा भरणे आहे
क्लर्क (जागा एक)
सुपरवायझर (जागा एक)
वॉचमन (जागा एक)
अनुभवास प्राधान्य
संपर्क 98 22 33 44 31

**पाहिजेत 9850545333**

एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी तात्काळ पाहिजेत
सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)
कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा
पगार - 15000 ते 20000व इतर सवलती
पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर

SR THORAT DAIRY — **पाहिजेत** — GAGANGIRI PACKAGED PURITY

| अ.क्र | पदाचे नाव | जागा | शैक्षणीक पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सेक्युरिटी गार्ड | ५ | अनुभव किमान ५ वर्षे. (Ex-Servicemen preferred) |
| २. | ईटीपी ऑपरेटर | २ | शिक्षण १२वी व पदवीधर अनुभव किमान ४ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ३. | बॉयलर फायरमन | २ | शिक्षण १२वी अनुभव किमान २ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ४. | 1st क्लास बॉयलर ऑपरेटर | २ | अनुभव किमान ५ वर्षे, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ५. | कामगार (पुरुष) | १० | शिक्षण १२वी वय मर्यादा ३० वर्ष |

समक्ष भेटणे – एच.आर. विभागास मुळ कागदपत्रासह रविवार सोडून.
ऑफिस – एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. राजापूर रोड संगमनेर
मोबा. 9860100936/937
E-Mail Id: admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com

MALPANI

प्रोसेस विभागात
**कामगार भरती**
चालू आहे!
वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,
पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,
नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)
पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व
ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती
सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-
अधिक माहितीसाठी संपर्क
मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी
मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००


'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अ‍ॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# दुसऱ्या एशियन योगासन चॅम्पियनशीपमध्ये महाराष्ट्राचे वर्चस्व!

## दिल्लीत पार पडली स्पर्धा; ध्रुव ग्लोबलच्या स्पर्धकांकडून पदकांची लयलुट

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

योगासनांना खेळाचा दर्जा प्राप्त झाल्यापासून देशभरातील विविध स्पर्धांमध्ये अव्वल यश मिळवणाऱ्या महाराष्ट्र संघाने दुसऱ्या एशियन योगासन चॅम्पियनशीप स्पर्धेतही जोरदार कामगिरी केली. एशियन योगासन व योगासन भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्लीत पार पडलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील योगासनपटूंनी २० सुवर्णपदकांची कमाई करतांना आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या स्पर्धेत राज्याचे नेतृत्त्व करणाऱ्या ध्रुव ग्लोबल स्कूलच्या स्पर्धकांनी योगासनाच्या विविध प्रकारात नेत्रदीपक कामगिरी करताना दहा सुवर्ण पदकांची लयलुट केली. पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता व उद्योग राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांच्या उपस्थितीत विजयी खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

एशियाखंडातील १६ देशांमधील योगासन खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीया, राज्यमंत्री रक्षा खडसे, योगऋषी स्वामी रामदेव, वर्ल्ड योगासनाचे सेक्रेटरी जनरल डॉ. जयदीप आर्य, योगासन एशियाचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी, सेक्रेटरी जनरल उमंग डॉन, योगासन भारतचे अध्यक्ष उदित सेठ व योगासन इंद्रप्रस्थचे अध्यक्ष रचित कौशिक यांच्या उपस्थितीत झाले.

तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करताना ध्रुव ग्लोबल स्कूलच्या रोहन तायडे व प्रणव साहु यांनी ज्युनिअर गटात प्रत्येकी दोन सुवर्णपदके मिळवली. मुलींच्या गटात तृप्ती डोंगरे, नीरल वाडेकर व गार्गी भट यांनीही आपले वर्चस्व निर्माण करताना प्रत्येकी दोन सुवर्णपदकं आपल्या नावावर केली. मुलांच्या सिनिअर गटात वैभव देशमुख आणि नीतिन पावले यांनी तर, मुलींच्या गटात तन्वी रेडिजनेही प्रत्येकी दोन सुवर्ण पदकं मिळवताना महाराष्ट्र संघाच्या विजयाची पताका फडकती ठेवली. महिलांच्या सिनिअर अ गटात महाराष्ट्राच्या सोनाली खरमारे, धनश्री लेकुरवाळे व ब गटात डॉ.शरयु विसपुते यांनी तर, पुरुषांच्या ब गटात भारत डेलीकर यांनी प्रत्येकी एक सुवर्ण पदकं मिळवताना महाराष्ट्र संघाच्या सुवर्ण पदकांचा तक्ता उंचावत नेला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी ध्रुव ग्लोबल स्कूलच्या ५० विद्यार्थ्यांनी योगवंदना सादर करताना उपस्थितांची मने जिंकली. आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत योगासन खेळाडूंना शपथ देण्यात आली. एशियाखंडातील १६ देशांचा सहभाग असलेल्या या संपूर्ण स्पर्धेत महाराष्ट्रसंघाने आपले वर्चस्व राखताना एकूण २० सुवर्ण पदके मिळवली. त्यात ध्रुव ग्लोबलच्या रोहन तायडे, प्रणव साहू, तृप्ती डोंगरे (तिघेही संगमनेर), नीरल वाडेकर (उन्ड्री, पुणे) व तन्वी रेडिज् (माजी विद्यार्थी) यांनी निम्मी पदकं पटकावली. महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशनचे




उपाध्यक्ष सतीश मोहगांवकर, सचिव राजेश पवार व कोषाध्यक्ष कुलदीप कागडे यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेची तांत्रिक बाजू डॉ.निरंजन मूर्ति यांनी सांभाळली.

# ऐतिहासिक वाडे पुस्तकाच्या माध्यमातून जिल्ह्याचा गौरवशाली वारसा समोर आला : देशमुख

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

लेखक सुमित डेंगळे यांनी उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील २५ हून अधिक ऐतिहासिक वाडे आणि घराण्यांवर लिहिलेले रिपोर्ताज एक उत्तम दस्तऐवज आहे. यासाठी संदर्भग्रंथांच्या अभ्यासाबरोबरच जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. यातून नगर जिल्ह्याचा गौरवशाली वारसा आपल्यासमोर आला असल्याचे प्रतिपादन इतिहास अभ्यासक तथा ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख यांनी केले.

शहरातील सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाने आयोजित केलेला सुमित डेंगळे लिखित 'ऐतिहासिक वाडे व घराणी' या पुस्तकाचा प्रकाशन परिसंवाद महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक व 'उज्ज्वल उद्यासाठी'चे संपादक प्रा. विठ्ठल शेवाळे, भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे आणि लेखक सुमित डेंगळे सहभागी होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स.ब.वि.प्र.स. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार डॉ. सुधीर तांबे होते.

डॉ. लांडगे म्हणाले, 'इतिहासात कर्तृत्व गाजवलेल्या व्यक्ती आणि घराण्यांचा इतिहास समोर येणं गरजेचं आहे. पुस्तकात वर्तमानाच्या नजरेतून भूतकाळाचा घेण्यात आलेला वेध आहे. अस्सल संदर्भग्रंथांची जोड असलेल्या या ग्रंथाला एका संदर्भग्रंथाचंच स्वरूप प्राप्त झालं आहे.डॉ.तांबे म्हणाले, अलीकडच्या काळात सखोल अभ्यासाची वृत्ती नाहीशी होताना दिसत आहे. इतिहासाचा तटस्थ अभ्यास होणे गरजेचे आहे. तसचं त्यातून समाजाने धडा घेणं गरजेचं आहे. डेंगळे यांच्यासारख्या अभ्यासू तरुणांनी समोर यायला हवं.यावेळी काही ऐतिहासिक घराण्यांचे वारसदार असणाऱ्या देसाई देशमुख (कुकाणा), सदाशिव थोरात (पानोडी), संतोष दहातोंडे (चांदा), गजेंद्र जाधवराव (माहेगाव देशमुख), विलास जाधव (निमगावजाळी) यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी केले तर सूत्रसंचालन, आभारप्रदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ आणि इतिहास विभाग प्रमुख त्रिंबक राजदेव यांनी केले.

नायक ANCHOR

# बिरोबाच्या यात्रेत पेटलेल्या कठ्याचा थरार!

## कौंठवाडी येथे पेटले नवसाचे ७८ कठे



▪ रविवारी रात्री नऊ वाजता यातील पेटवलेला मानाचा कठा उचलला गेला आणि इतर धगधगते कठे हे भका डोक्यावर घेत मंदिराभोवती फेऱ्या मारण्यास सुरुवात झाली. आग ओकणाऱ्या प्रत्येक कठ्या मागे नवस फेडणारी एक व्यक्ती त्यात गोडेतेल ओतत होती. धगधगत्या करुपात औतलेले तेल या भक्तांच्या अंगा खांद्यावरून ओघळत होते, पण श्रध्देपोटी उचललेल्या या काठ्यांतून ओघळणाऱ्या गरम तेलाची इजा आजपर्यंत कोणालाही झाली नसल्याचे गावकरी सांगतात.

**नायक वृत्तसेवा, राजूर**

गावातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवत आलेल्या बिरोबाच्या काठीचा गाभाऱ्यातील मूर्तीला स्पर्श झाला. घंटानाद झाला अन् नवसाचे कठे पेटवले गेले. कठे पेटताच मोकळ्या जागेत भक्तांचा हाई हाई चा चित्कार आणि यानंतर सुरू झाला कठ्याच्या यात्रेचा थरार. हजारो भाविकांच्या उपस्थितीत कठ्यांतून निघणाऱ्या त्या ज्वाळांनी किर्र अंधाऱ्या रात्री सभोवतालचा आसमंतही उजाळून निधाला.

राजूर पासून जवळच असलेल्या अकोले तालुक्यातील कौठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत मानाच्या कठें बरोबर तब्बल ७८ नवसाचे कठे पेटले. आदिवासी समाज आपली धार्मिकता आणि श्रद्धा जपत गेल्या अनेक वर्षाच्या परंपरेनुसार कौठवाडी येथे अक्षय तृतीयेच्या नंतर येणाऱ्या रविवारी बिरोबाची म्हणजेच कठेची यात्रा भरत असते. अकोले तालुक्यातील कोठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत नवसाचे कठे पेटले.

इतिहास पाहता कठची संख्या आणि उपस्थितांची संख्या यात वाढ होताना दिसून येत आहे. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भावीकांच्या डोळ्याचे पारणे फेडले बिरोबा ट्रस्ट अध्यक्ष दत्ता भोईर, यात्रा समिती,कौठवाडी व साकीरवाडी ग्रामस्थ यांनी यात्रेचे नियोजन केले. तसेच कठे चालू केल्यावर आमदार डॉ.किरण लहामटे यांनीही उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या. राजूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पो. कॉ. वाडेकर, पो. कॉ. उषा मुठे, पन्हाळे,कोंडार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. यामुळे ही कठे ची यात्रा निर्विघ्नपणे संपन्न झाली.

गव्यम पशु आहार
या उत्कृष्ट पशुखाद्य विक्रीसाठी
सेल्स प्रमोटर - ५ जागा
( आकर्षक पगार व सुविधा )
पाहिजेत
▪ महाराष्ट्रातील रिजन मध्ये व संगमनेर तालुक्यातील दूध संकलन केंद्रामध्ये फिरण्याची तयारी आवश्यक.
▪ टु-व्हिलर व फोर-व्हिलर येणे आवश्यक.
▪ टॅब चालविण्याचे ज्ञान आवश्यक.
संपर्क
गव्यम आयुर्वेदिक पशु आहार
हल्दी, तुलसी, शतावरी, धान्य व तेलबिया, हायप्रोटीन खाद्य युक्त
ऑफीस - C/o. पडतानी इंडस्ट्रीज, जोशी हॉटेल मागे, संगमनेर
9142003939

DEVISH ADVERTISER - 9850983394
दर्शन टेक्सटाईल मार्केट
साडीमध्ये सौंदर्य आत्मविश्वास आणि ठाम ठाम ठाम
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

श्री कळसेश्वर महाराज श्री गणेशाय नमः श्री संत सेना महाराज
#1 CUT'S Hair & Beauty Studio
ONE CUT WIG CENTRE
काही मिनिटातच तारूण्य अवस्थेतील केस परत मिळवा..
टक्कल पडलेय नो टेन्शन त्यावर आहे आता नवीन ऑप्शन
Before After
ऑपरेशन विना तारूण्यावस्थेतील केस परत मिळवा
₹ 10,000 ₹ 6,999/-
पत्ता - अभंग पेट्रोल पंपासमोर, पेटीट हायस्कुल अकोले रोड, संगमनेर
मो. 9511233837 / 9142255255

गुंतवणुकीची प्रत्येक स्टेप तुमच्या आर्थिक स्वप्नपूर्तीकडे
28 वर्षांची विश्वासाई परंपरा !
MUTUAL FUNDS Sahi Hai
म्युच्युअल फंड्स, एस.आय.पी., पी.एम.एस., एन.पी.एस., सिस्टीमॅटिक विड्रॉल प्लॅन, सिस्टीमॅटिक ट्रान्सफर प्लॅन, टर्म लाईफ इन्शुरन्स, मेडीक्लेम
SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर

शुभ विवाह महोत्सव
आपल्या लाडक्या मुलीच्या कन्यादाना साठी ८५०००/- रुपयांपासून पुढे भांडी व फर्निचर खरेदी करा
२५०००/- रुपयांचे हनिमून पॅकेजचे मानकरी व्हा ..!
प्रत्येक बस्त्यावर Traveler Bag हमखास मोफत मिळवा.
अगदी कमी ग्राहकांच्या संख्ये मधून मानकरी होता येईल..!
ऑफर कालावधी : २० एप्रिल ते ३० जून पर्यंत लागू .
* नियम व अटी लागू
जिव्हाळा आंतरिक... वस्तू अत्याधुनिक ..!
गृह वस्तू भांडार ®
• फर्निचर • भांडी • इलेक्ट्रॉनिक्स
शाखा नं. 1 व 2 (IFB Point): बाजारपेठ, संगमनेर । मो. 7719047007
शाखा नं.3 समनापूर गणपती मंदिराजवळ संगमनेर । मो. 9175569966

कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५